स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम./माध्य परीक्षा-२३/775
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक - २८/०६/२०२३

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२३ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत..**

**संदर्भ :-** राज्यमंडळाचे जा.क्र.रा.मं/परीक्षा-८/२७२३ दि.२७/०६/२०२३ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.४६ अन्वये जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२५/०६/२०२३ रोजी संपुष्टात आली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारीत मुदत संपल्यानंतर अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/-प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.१००/-प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.२००/-प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा | शुक्रवार दि.३०/०६/२०२३ ते बुधवार दि. ०५/०७/२०२३ | गुरुवार दि.०६/०७/२०२३ ते मंगळवार दि. ११/०७/२०२३ | बुधवार दि.१२/०७/२०२३ ते सोमवार दि. १७/०७/२०२३ |

सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची **Print Out** व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्क रोखीने अथवा चलनाने भरुन घेण्यात येईल. सदर शुल्क मंडळाकडे प्राप्त झाल्यानंतर अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.

अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षाकेंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहिर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब माध्यमिक शाळामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने भरलेले आवेदनपत्रे **परिशिष्ट 'अ'** भरुन समक्ष या कार्यालयामध्ये जमा करण्यात यावीत.

(डी.एस.पोवार),
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - परिशिष्ट अ

160

# परिशिष्ट–अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ------------------------------

विभागीय मंडळाचे नावः ------------ विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः ---------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ----------------------------------------------------

२) शाळेचे नाव व पत्ता : --------------------------------------------------

३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : -----------------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार
ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन
क ( ) नैसर्गिक आपत्ती
ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. --------------------------- २. ----------------------------
३. --------------------------- ४. ----------------------------
५. ----------------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-

--------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला – रोख/धनाकर्ष (डी.डी.)/चलन क्रमांक --------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ------------------------------------

------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का